बोटीचे गाणे

मराठी: अश्विनी बर्वे

मोमोलू बोंगा गावात, पाण्याजवळ, जिथे राहत होता त्या गावात प्रत्येक माणसाकडे स्वतःची होडी होती, जी झाडाच्या खोडापासून बनवलेली एक कोरीव होडी होती. पण मोमोलूचे वडील, फ्लुम्बो, यांची होडी एका मगरीशी झालेल्या लढाईत हरवली होती. आता फ्लुम्बो एक खास झाड शोधायला निघाले होते, जे अगदी योग्य असेल, ज्यापासून ते एक उत्तम नवीन होडी बनवू शकतील. आणि जरी हा शोध बराच काळ चालणार होता, तरी त्यांचा लहान मुलगा त्यांच्यासोबत जात होता. मोमोलू म्हणाला, "हत्ती मोठी टेकडी ओलांडतो; बकरीसुद्धा त्याच प्रकारे मोठी टेकडी ओलांडते." मोमोलू आपल्या प्रिय वडिलांना त्यांची होडी "शोधायला" कशी मदत करतो, ही हृदयस्पर्शी कथा आफ्रिकन गावातील जीवनाच्या आणि प्राचीन परंपरांच्या अस्सल प्रतिमांनी समृद्ध आहे. बायबलमधील कथांच्या त्यांच्या सुप्रसिद्ध पुनर्कथनांप्रमाणेच, लॉरेन्झ ग्रॅहम यांनी अशा आफ्रिकन कथाकाराची ओजस्वी काव्यमय भाषा वापरली आहे, ज्यांच्यासाठी इंग्रजी अजूनही नवीन आहे. लिओ आणि डायन डिलन यांची लक्षवेधी चित्रे आफ्रिकन वुडकट्सच्या शैलीत साकारली आहेत.

आफ्रिकेत अनेक राष्ट्रे किंवा जमाती आहेत. प्रत्येक जमातीचे लोक स्वतःची भाषा बोलतात. पश्चिम आफ्रिकेत ती भाषा मांदिंगो, क्रू, योरुबा किंवा इबो असू शकते.परंतु अनेक लोक इंग्रजी बोलायला शिकले आहेत. जे शाळेत गेले आहेत, त्यांचा शब्दसंग्रह मोठा असतो आणि ते व्याकरणाचे कठोर नियम पाळतात. इतर लोक सोप्या भाषेत बोलतात. इंग्रजीत ते काव्य जिवंत करतात आणि दमदार लय आणतात.ही गोष्ट आहे फ्लुम्बो नावाच्या एका आफ्रिकन गावकऱ्याची, ज्याने मगरीशी झालेल्या लढाईत आपली बोट गमावली आहे, आणि त्याचा मुलगा मोमोलू, ज्याने आपल्या वडिलांना नवीन बोट मिळवून देण्यास मदत केली. ही गोष्ट तेथील लोकांच्या लोकभाषेत सांगितली आहे.

बोटीचे गाणे

मराठी: अश्विनी बर्वे



फ्लुम्बो बोंगा शहरात फिरत असे.
तो सगळ्यांना काय कसे काय? विचारायचा.
पण तो हार मानायचा नाही, कारण त्याच्याकडे
नाव नव्हती. मगरीने त्याची नाव तोडली
होती.सगळे लोक फ्लुम्बोला ओळखतात आणि
तो त्यांना आवडतो. फ्लुम्बो ताकदवान आहे.
तो इतर माणसांपेक्षाही जास्त ताकदवान आहे.

तो बलवान आणि चांगला आहे.
लोकांना तो खूप आवडतो.
जेव्हा फ्लंबो पाण्याजवळ जातो, तेव्हा बरेच लोक त्याला म्हणतात, "अरे, या वेळी तुझ्याकडे होडी नाही."

"तर आता तू माझ्या होडीत ये; माझी होडीही तुझ्या होडीसारखीच आहे याची खात्री बाळग."
फ्लम्बो "नाही!" म्हणे आणि हसे.
फ्लम्बो म्हणाला, "जर फ्लम्बोने दुसऱ्या माणसाची होडी घेतली, तर काही वेळातच मगर ती तोडून टाकेल, अगदी त्याचप्रकारे जशी मगरीने माझी तोडली होती."
फ्लम्बो बाहेरून हसतांना दिसला हसला. पण फ्लम्बो मनात हसत नव्हता.

लवकरच एके सकाळी फ्लुम्बो उठला आणि म्हणाला,
"आता मी माझी होडी शोधायला जातो."
त्याने एक कोयता आणि एक कुऱ्हाड उचलली.
त्याच्या बायकोने पोर्टीने, एका स्वच्छ कापडात एक
लहानसा तुकडा गुंडाळला आणि तिचा लहान मुलगा,
मोमोलूने, तो तुकडा उचलला.



फ्लुम्बोने आपल्या लहान मुलाकडे पाहिले.तो म्हणाला,
"मी ज्या रस्त्याने चालतो तो खूप लांब आहे. ओह, तो माझ्या
लहान मुलाच्या पायांच्याही पलीकडचा लांब आहे.“
मोमोलूने वर पाहिले आणि तो म्हणाला, "हत्ती मोठी टेकडी
ओलांडतो; बकरीसुद्धा त्याच प्रकारे मोठी टेकडी ओलांडते."

आणि मग ते दोघे निघाले.
फ्लेम्बो पुढे आणि त्याच्यामागे मोमोलू.
ते नदीच्या किनाऱ्याने जाऊ लागले,
त्यांनी एक नदी ओलांडली,
मग दुसरी नदी त्यांना लागली.

जेव्हा फ्लंबो एखादे काळे निलगिरीचे झाड बघे,
तेव्हा तो त्याकडे नीट निरखून बघे.
काही झाडे खूप मोठी होती.
काही झाडे खूप लहान. काही झाडे सरळ नव्हती.
काही झाडे स्वच्छ नव्हती.
एका सुंदर होडीसाठी एकही झाड योग्य वाटत नव्हते.

थोड्या वेळाने मोमोलू थकला, पण
तो स्वतः एक शब्दही बोलला नाही.
थोड्या वेळाने सूर्य डोक्यावर आला,
आणि मोमोलूला भूक लागली.

आता मोमलू म्हणाला, "पाय पोटापेक्षा जास्त मजबूत आहेत; पाय म्हणतात 'चालत रहा,' पोट म्हणतं 'थांब.' माझे बाबा आता काय म्हणतात?
"फ्लबो म्हणाला,"पोटाला अक्कल आली आहे."
ते दोघे एका लहान नदीकिनारी बसले.
ते दोघे जेवले.
त्यांनी उकडलेली कंदमुळे, वाटलेले वाटाणे आणि गोड संत्री खाल्ली.



सर्वांनी विश्रांती घेतली. सर्व थकले आहेत. सर्वजण झोपले.

मोमोलूला कोणीतरी त्याचे नाव घेत असल्याचे ऐकू येते:
"मोमोलू! मोमोलू!"

मोमोलू म्हणाला,
"मोमोलूला कोणी बोलावले?" मोमोलूला पुन्हा ऐकू आले.
"मोमोलू! मोमोलू! माझ्यासोबत ये."



मोमोलू उठला आणि चालू लागला.
मोमोलूला माहीत नव्हते तो कुठे चालला आहे ते?
मोमलूला माहीत नव्हते तो कोणत्या ठिकाणी चालला आहे? तो फक्त चालत राहिला.

मोमोलूला लोकांचे हसणे ऐकू येते. तो त्यांना म्हणताना ऐकतो, "हा मोमोलू आहे! आता आमची हृदये शांत झाली आहेत. कारण आमचा चांगला मित्र आला होता.”

मोमलू म्हणाला, “आता मला तुमचे शब्द ऐकू येत आहेत.
पण मला तुमचे चेहरे दिसत नाहीत.
कोणत्या बाजूला तुम्ही आहात?
मग लोक म्हणाले, तुझे डोळे उघड.”
मग मोमलूने डोळे उघडले आणि बघितले.

त्याने त्या लोकांकडे बघितले जे इतरांपेक्षा पूर्णपणे वेगळे होते.
ते इतर सर्वांपेक्षा जास्त आनंदी होते. आणि जेव्हा ते बोलत, तेव्हा त्यांचे बोलणे एखाद्या गाण्यासारखे वाटे. जेव्हा ते चालत, तेव्हा ते हवेत अगदी अलगदपणे जात, आणि त्यांना थकत नसत.



लोक म्हणत होते, "यावेळी आम्ही तुला दाखवतो. चल!" मोमोलू हवेत त्याच मार्गाने पुढे गेला.थोड्या वेळाने लोक म्हणाले, "आता तुला होडी दिसतेय!“ मोमोलूला एक सुंदर झाड दिसते, जे त्याने यापूर्वी पाहिलेल्या सर्व झाडांपेक्षाही सुंदर होते. आणि तो पाहत असतानाच, त्या झाडाचे होडीत रूपांतर झाले. आणि तो आणखी पाहत असताना, त्या होडीचे झाड झाले. मोमोलू म्हणाला, "आता मला दिसले!"

फ्लुम्बो मोमलूला म्हणतो 'चला, आपण जाऊया!'
मोमोलू म्हणतो, 'थांबा बाबा, मला तुमची होडी दिसतेय.'
मग मोमोलू जागा होतो आणि त्याला कळते.
त्याला कळते की ते एक स्वप्न होते. तो बाबांना सांगतो.

फ्लंबो म्हणाला, "अहं! चला, आपण जाऊया! आता माझा छोटा मुलगा पुढे चालेल, आणि मी त्याच्या मागे चालेन." मोमोलू चालू लागला. तो कोणत्या मार्गाने जात आहे हे त्याला माहीत नव्हते. तो त्या ठिकाणी का जात आहे हेही त्याला माहीत नव्हते. थोड्या वेळाने तो त्याच सुंदर झाडाजवळ थांबला.
फ्लंबो म्हणाला, "मला माझी होडी दिसली!ती या झाडाच्या आत आहे."

बऱ्याच दिवसांपासून फ्लुंबो झाडासाठी काही ना काही आणत असतो.
एके दिवशी तो एक जाड कापड आणतो, निळ्या रंगाचे, ज्यावर लहान पांढऱ्या रेषा असतात.
तो ते झाडाभोवती गुंडाळतो. एके दिवशी तो झाडाजवळ एक चकचकीत पितळी तवा ठेवतो.
तो ताडी शिजवून तव्यात घालतो. एके दिवशी तो ताडी आणतो, ताडीने भरलेला एक जड भोपळ्याचा प्याला. तो ती जमिनीवर ओततो;
डिंकाच्या वृक्षाखाली तो ती सगळी ताडी ओतून टाकतो.

आणि मग एके दिवशी बोमोको पुजारी, गावातील सर्व लोकांसोबत आला. ढोल वाजवणाऱ्यांनी आपले ढोल वाजवले, आणि बोमोकोकोने झाडाच्या आत्म्याला आवाहन केले.



गायक गातात. नर्तक नाचतात. आणि काही वेळाने आत्मा म्हणतो, ही होडी फ्लुम्बोसाठी आहे.

बऱ्याच दिवसांनी फ्लंबो आला. त्याने कापले. त्याने कापले.
त्याने कापले. थोड्या थोड्या वेळाने ते झाड खाली पडले.
पुन्हा बऱ्याच दिवसांनी फ्लंबोने कापले. त्याने कापले.
त्याने कापले. त्याने कापले.
थोड्या थोड्या वेळाने त्याने त्याचा एक तुकडा केला.

पुन्हा भरपूर दिवस फ्लम्बो आकार देण्यासाठी,
कोरीव काम करण्यासाठी काम करत राहिला.



बसण्यासाठी गोल तळ, आत बसण्यासाठी आसन बनवण्यासाठी, सपाट करण्यासाठी, स्वच्छ करण्यासाठी जागा, असे सगळं तयार करत हळूहळू होडी तयार होईल.



."

सर्वजण बघायला आले. सर्व लोक म्हणाले, "अरे! फ्लंबोने काय छान होडी बनवली आहे, सगळ्या होड्यांपेक्षाही उत्तम!" फ्लंबो म्हणाला, "माझ्या लहान मुलाने ही होडी माझ्यासाठी शोधून आणली. सगळ्या लोकांना काही कळले नाही."



आता ते सफरीला निघाले.फ्लंबो मागे बसला आहे, आणि तो वल्हवतो.
मोमोलू पुढे बसला आहे, आणि तो आपला ढोल वाजवतो आणि गातो.
पोर्टी मध्ये बसली आहे, आणि पोर्टी खूपच आनंदी आहे.
ती आनंदी आहे कारण तिच्या नवऱ्याने एक होडी बनवली आहे.
ती आनंदी आहे, कारण तिच्या लहान मुलाने एक गाणे गायले आहे.
होडीचे गाणे ऐका. मोमोलूने गायलेले ते गाणे ऐका:
"फ्लंबोने एक छान होडी बनवली आहे. फ्लंबोने एक छान होडी बनवली आहे.
फ्लंबोने एक छान होडी बनवली आहे, आणि पाण्यालाही ती खूप आवडत आहे."

समाप्त